COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भाव- लॉकडाऊन कालावधीत बेघर, विस्थापित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी निवारागृह, अन्नधान्य व भोजन व्यवस्थेबाबत करावयाच्या तातडीच्या उपाययोजना.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांक :डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१
मंत्रालयमुंबई , ०३२ ४०० -
दिनांक :२९ मार्च२०२०,

संदर्भ :१. शासन अधिसुचना क्रमांक : डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक २३.३. २०२०
२. शासन अधिसुचना क्रमांक : डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक २४.३. २०२०
३. शासन अधिसुचना क्रमांक : डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक २५.३.२०२०

**प्रस्तावना :**

कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखणे व या संदर्भात तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य स्तरावर कोरोना नियंत्रण कक्ष व जिल्हास्तरावर जिल्हा सनियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. कोरोना विषाणुंचा राज्यामधील प्रादुर्भाव रोखण्यासाठी संदर्भाधीन अधिसुचनेव्दारे राज्यामध्ये लॉकडाऊन परिस्थिती लागू करण्यात आली आहे.

सदर लॉकडाऊन परिस्थितीमुळे उद्योग व्यवसाय प्रभावित झाल्यामुळे कामगार विस्थापित/बेरोजगार झाले असून,राज्यात विविध जिल्हयांच्या ठिकाणी अडकलेले आहेत. अशा लॉकडाऊन परिस्थितीमुळे बेघर, विस्थापित झालेले कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्या साठी निवारागृह , पाणी , अन्न धान्य व भोजन व्यवस्था व वैद्यकीय देखभाल या सुविधा देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :**

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशामुळे बंद झालेल्या उद्योग व्यवसायातील प्रभावित झालेले कामगार, परराज्यातील विस्थापित कामगार व बेघर व्यक्ती यांचेसाठी निवारागृह, अन्न, पाणी, वैद्यकीय देखभाल या सुविधा स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने केंद्रीय किचन व्यवस्थेच्या माध्यमातून शिजविलेले / शिजविण्यासाठी तयार अन्नाचे पुरवठा करण्यात यावे असा निर्णय घेण्यात येत आहे.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

२. वरील निर्णयाच्या अनुषंगाने ग्रामीण भागासाठी प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी स्तरावर आणि शहरी भागामध्ये महानगरपालिका आयुक्त यांचे स्तरावर तातडीची उपाययोजना करण्यात यावी. सदर निर्णयाचे अनुषंगाने उपाय योजनांचे नियोजन करणे, अंमलबजावणी आणि संनियंत्रणासाठी राज्यस्तरावर खालीलप्रमाणे "राज्यस्तरीय संनियंत्रण समिती" गठीत करण्यात येत आहे.

राज्यस्तरीय संनियंत्रण समिती

| | |
|---|---|
| मा.मुख्य सचिव | अध्यक्ष |
| अप्पर मुख्य सचिव (महसूल) | सदस्य |
| अपर मुख्य सचिव ( नगरविकास ) | सदस्य |
| प्रधान सचिव ( अन्न व नागरी पुरवठा ) | सदस्य |
| प्रधान सचिव ( सहकार ) | सदस्य |
| प्रधान सचिव ( कामगार ) | सदस्य |
| सचिव ( आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन ) | सदस्य-सचिव |

३. उपरोक्त उपाययोजनांची जिल्हास्तरावर नियोजनपुर्वक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आवश्यक असलेल्या सदस्यांची "जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती" जिल्हाधिकारी यांनी गठीत करावी.

४. महानगरपालिका स्तरावर वरील उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आवश्यक असलेल्या इतर सदस्यांची " महानगरपालिका स्तरीय संनियंत्रण समिती" महानगरपालिका आयुक्त यांनी गठीत करावी.

५. लॉकडाऊनच्या कालावधीत अडकलेल्या मजूर, विस्थापित व बेघर व्यक्तींना आवश्यकतेनुसार निवारागृह, अन्न, पाणी व वैद्यकीय देखभाल सुविधा उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्यावर राहील. शहरी भागासाठी या सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधीत महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांची संयुक्तरित्या राहील. जिल्हास्तरीय समिती व महानगरपालिका सनियंत्रण समिती या दोन्ही समित्या राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या मार्गदर्शनाखाली आणि निर्देशाप्रमाणे कामकाज करेल.

६. जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती खालील प्रमाणे कार्यवाही करेल:

(i) जिल्हयातील विविध भागामध्ये विविध घटकातील जीवनावश्यक सुविधा उपलब्ध न झालेले मजूर, विस्थापित व बेघर व्यक्ती यांची निश्चिती करणे.

(ii) सदर गरजू व्यक्तींची तालुकानिहाय आणि भागनिहाय यादी तयार करणे.

(iii) या यादीच्या आधारावर तालुकानिहाय आणि भागनिहाय लागणारी अन्नधान्याची आवश्यकता व उपलब्धता निश्चित करणे.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

(iv) सदर कामे पार पाडण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर काम करणा-या स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था, धर्मादाय संस्था, सहकारी संस्था, तसेच CSR मधून मदत उपलब्ध करुन देणा-या संस्था, दानशूर व्यक्ती यांची यादी तयार करणे .

(v) उपरोक्त स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था, धर्मादाय संस्था, सहकारी संस्था, तसेच CSR मधून निधी उपलब्ध करुन देणारी संस्था, दानशूर व्यक्ती यांना अन्नधान्य व निधी स्वरुपात मदत करण्याबाबत जाहीर आवाहन करणे.

(vi) शिजविलेले / शिजविण्यासाठी तयार असलेले अन्न वितरीत करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करणे .

(vii) स्थानिक पातळीवर अन्नधान्य स्वरुपात मिळालेली मदत, मागणी प्रमाणे किती लोकांसाठी पुरेशी असेल याची निश्चिती करणे.

(viii) एकुण मागणी पैकी सर्व मागणी स्वयंसेवी संस्थांमार्फत मिळणा-या मदतीमधून पूर्ण होणार नसल्यास, पुढील काळात राहिलेली मागणी पूर्ण करण्याकरिता अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून मिळणारे अन्नधान्य, तसेच, मदत व पुनर्वसन विभागामार्फत मिळालेल्या निधीतून ही मागणी कशी पूर्ण करता येईल याचे नियोजन करणे.

(ix) महानगरपालिका क्षेत्रासाठी / जिल्हा स्तरावर कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी, जेणेकरुन संबंधीत नोडल अधिकारी आपल्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, धर्मादाय संस्था, दानशूर व्यक्ती यांचेशी समन्वय साधून अन्नधान्य स्वरुपात मदत प्राप्त करतील.

(x) कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी Social Distancing Protocol पाळणे आवश्यक असल्या कारणाने, तसेच अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रात कामकाजाचे संनियंत्रण करण्यासाठी वॉर्ड स्तरावर एक किंवा एका पेक्षा अधिक नोडल अधिकारी यांची नेमणूक करणे आणि नोडल अधिकारी यांची माहिती शासनाला उपलब्ध करुन देणे ( परिशिष्ट-१).

(xi) या यंत्रणेमध्ये काम करणा-या सर्व व्यक्तींना स्वच्छता व कोरोना विषाणु प्रतिबंधाबाबतच्या सूचना व निर्देश देणे.

(xii) सर्व जिल्हाधिकारी यांनी स्थापित केलेल्या जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांक तातडीने प्रसिध्द करावेत.

७. वरील अंमलबजावणी करताना जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांची कर्तव्ये व जबाबदा-या खालील प्रमाणे राहतील:

(अ) महानगरपालिका क्षेत्र / जिल्हयात तात्पुरते निवारागृह उपलब्ध करुन देणे :

(i) लॉकडाऊनमुळे बहुतांश लोकांची राहण्याची, खाण्याची व आरोग्याची असुविधा निर्माण झालेली आहे. अशा लोकांना अन्नाची सुविधा उपलब्ध करण्याबरोबरच त्यांची तात्पुरती



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

राहण्याची सुविधा सुध्दा उपलब्ध करुन देणे आवश्यक झाले आहे. यास्तव केंद्र शासनाने त्यांचे आदेश क्रमांक- ३३-०४-२०२०-NDM-१, दि.२८ मार्च २०२० अन्वये, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) च्या निकषा संदर्भात COVID-19 Virus Outbreak संदर्भात सुधारीत सूचना व त्या अनुषंगाने शासनाने दिनांक २८ मार्च,२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार या निधीमधून बेघर, तसेच विस्थापित झालेले आणि लॉकडाऊन मुळे अडकलेल्या व्यक्तींसाठी मदत छावण्या स्थापित करणे आणि अन्न, पाणी, वस्त्र व वैद्यकीय देखभाल, स्वच्छतागृहे इत्यादी अत्यावश्यक सुविधा त्यांना उपलब्ध करुन देण्यास अनुमती देण्यात आली आहे. सबब सर्व महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर तातडीने "निवारागृहे" स्थापित करावीत. यासाठी स्थानिक पातळीवर शाळा, महाविद्यालये, समाजमंदिर, मंगल कार्यालय व इतर निवास योग्य इमारती/हॉल अशी योग्य ती ठिकाणे निवडून प्राधान्याने जिल्हयाच्या मुख्यालयी व आवश्यकतेनुसार इतर सर्व ठिकाणी स्थानिक पातळीवर विशेषत: औद्योगिक वसाहतीनजीक निवारागृहाद्वारे तात्पुरत्या राहण्याची सोय करावी.

(ii) ऊसतोड कामगारांच्याकरिता संबंधित साखर कारखान्यांनी त्यांचेकरिता आवश्यक असलेली वरील सुविधा देण्यासाठी निवारागृहाची व्यवस्था करावी. ज्या साखर कारखान्यांना अशी निवारागृहे कार्यान्वित करण्यास अडचणी आल्यास त्याबाबतीत जिल्हाधिकारी/महानगर पालिका आयुक्त यांच्या मार्फत सहाय्य करण्यात यावे.

(iii) लोकांना अशाप्रकारच्या सोयी महानगरपालिका /जिल्हास्तरावर किंवा स्थानिक पातळीवर उपलब्ध आहेत हे माहीत होण्यासाठी स्थानिक प्रसार माध्यमातून प्रसिध्दी दयावी.

(iv) वरील अनुक्रमांक १ व २ नुसार स्थापित केलेल्या निवारागृहांची माहिती सोबत जोडलेल्या (परिशिष्ट-२) मध्ये शासनास वेळोवेळी नियमितपणे सादर करावी.

(v) सर्व महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर हेल्पलाईन तयार करुन त्यांचे किमान २ ते ३ दूरध्वनी क्रमांक प्रसिध्दी माध्यमाद्वारे जाहीर करावेत.

(vi) उपरोक्त कार्यवाही सर्व महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सत्वर पूर्ण करावी.

**(ब) कम्युनिटी किचनची सुविधा उपलब्ध करुन देणे**

(i) लॉकडाऊनच्या कालावधीत विस्थापित झालेले मजूर, बेघर व्यक्ती यांच्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात कम्युनिटी किचन सुरु करण्याकरिता ठिकाण निश्चित करण्यात यावे, जसे की, नजिकच्या जिल्हापरिषद/ महानगरपालिका शाळा व विद्यालये, सार्वजनिक मैदाने, समाजमंदिर, खाजगी मंगल कार्यालये, धार्मिक प्रार्थना स्थळे/संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील लिलावगृहे,औद्योगिक वसाहती, इत्यादी ठिकाणी आवश्यकतेनुसार करण्यात यावीत.



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

(ii) प्रत्येक कम्युनिटी किचन मध्ये आवश्यकतेप्रमाणे भांडी,स्वयंपाकासाठी आवश्यक असणारे साहित्य व पाणी उपलब्ध करुन दयावे.

(iii) कम्युनिटी किचन मार्फत अन्न तयार करणा-या व्यक्तींना / समुहाला आवश्यक अन्नधान्याचा पुरवठा हा स्वयंसेवी संस्था व इतर संस्थांमार्फत गोळा करण्यात आलेले अन्नधान्यातून व मदत व पुर्नवसन विभागामार्फत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीव्दारे उपलब्ध झालेल्या निधीमधुन भागविण्यात यावा.

(iv) तसेच अशा प्रकारे कम्युनिटी किचनव्दारे भोजन व्यवस्था करताना अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत शिवभोजन योजनेतंर्गत स्थापन करण्यात आलेल्या केंद्राशी योग्य समन्वय राखण्यात यावा.

(v) सदरची सुविधा ही राज्यातील लॉकडाऊनमुळे उदरनिर्वाहीची साधने संपुष्टात आलेले राज्यातील/परराज्यातील विस्थापित कामगार, निराश्रीत व्यक्ती, प्रवासादरम्यान अडकलेले व्यक्ती इत्यादींना लागू राहील. याकरिता त्यांचेकडून रेशनकार्ड अथवा ओळखपत्र तपासण्याची आवश्यकता असणार नाही व या सोयी सुविधांपासून कोणतीही गरजू व्यक्ती वंचित राहणार नाही याची खातरजमा करावी.

(vi) महानगरपालिका क्षेत्रामध्ये उपरोक्त सर्व बाबींचे नियोजन वॉर्डनिहाय सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत आयुक्त महानगरपालिका यांनी पार पाडावे.

(vii) अशाप्रकारे स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने स्थापित करण्यात आलेल्या कम्युनिटी किचन मध्ये ज्या लोकांना मदत देण्यात आली आहे त्याची माहिती **(परिशिष्ट-३)** मध्ये सादर करावी.

(viii) या संदर्भात सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात येत आहेत की, विविध स्वयंसेवी/वाणिज्यिक संस्था अथवा व्यक्ती यांचेकडून शासनास विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आलेले/येणारे विविध साहित्य त्यांचेशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावेत व गरजूंना त्यांचे आवश्यकतेनुसार वितरण करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(अजोय मेहता)
मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मामुंबई,मंत्रालय,उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
४. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
५. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,



**Scanned with CamScanner**
Scanned with CamScanner

६. प्रधान सचिव सार्वजनिक आरो)ग्य विभाग ,(जी,मुंबई ,हॉस्पीटल.टी.
७. अपर मुख्य सचिव ,सचिव/ प्रधान सचिव/ सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,मुंबई,मंत्रालय,
८. संचालक ,(आरोग्य सेवा)महाराष्ट्र राज्य,मुंबई,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०.सर्व जिल्हाधिकारी,
११.सर्व महानगरपालिका आयुक्त,
१२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४.महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१५.संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१७.मा यांचे खाजगी (मदत व पुनर्वसन)मंत्री.सचिवमुंबई,मंत्रालय,
१८. मामुंबई,मंत्रालय,यांचे खाजगी सचिव (मदत व पुनर्वसन) राज्यमंत्री .
१९.निवड नस्ती (कार्यासन/ आव्यप्र-१ )

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

शासन निर्णय, क्रमांक :डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक २९.३.२०२० चे परिशिष्ट

## परिशिष्ट १ - नोडल अधिकारी यादी

**List of Nodal officer to be shared in excel format only**

| Sr. No. | District/Municipal Corporation | Name | Designation | Mobile Number | Email ID |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |

Ajit Ralb

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

शासन निर्णय, क्रमांक :डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक २९.३.२०२० चे परिशिष्ट

परिशिष्ट २- निवारा गृह / कम्युनिटी किचन यादी

**List of Nivara Gruha/Community canteen to be shared in excel format only.**

| Sr. No. | District | Taluka | Name | address | Max Capacity |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

शासन निर्णय, क्रमांक :डीएमयु/२०२०/ प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक २९.३.२०२० चे परिशिष्ट

परिशिष्ट ३ - दैनंदिन अहवाल

| Date | District | No. of Nivara Gruha | No of people accommodated | No of Community Kitchen | No of people served food through community kitchen |
|---|---|---|---|---|---|
| 29-03-2020 | | | | | |
| 30-03-2020 | | | | | |
| 31-03-2020 | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

तार : 'फूडकोर्प'
Gram : 'FOODCORP'
फैक्स नं: एचएफसीआई एन डी
Fax No.: HFCI ND
00911123413241
00911143527433

भारतीय खाद्य निगम
FOOD CORPORATION OF INDIA

मुख्यालय नई दिल्ली
Head Quarters New Delhi

आइ॰एस॰ओ॰ 9001:2000 प्रमाणित

16-20, बाराखम्बा लेन, नई दिल्ली-110001, दूरभाष: 011-43527697, 43527698
16-20, BARAKHAMBA LANE, NEW DELHI - 110001, PHONE: 011-43527697, 43527698

No. J. 1(1)/ 2019-20/ OMSS (D)/BC/ S.III/Vol.III

Dated: 27.03.2020

कार्यकारी निदेशक,
भारतीय खाद्य निगम,
आंचलिक कार्यालय,
नोएडा / मुंबई/ कोलकाता/ चेन्नई/ गुवाहाटी।

महाप्रबंधक (क्षेत्र),
भारतीय खाद्य निगम,
क्षेत्रीय कार्यालय,
हैदराबाद/ पटना/ रायपुर/ मुम्बई/ अहमदाबाद/ पंचकुला/ शिमला/ जम्मू/ रांची/ बंगलुरु/ तिरुवनंतपुरम/ भोपाल/ गुवाहाटी / इटानगर/ इम्फाल/ शिलोंग/ दीमापुर/ भुवनेश्वर/ चंडीगढ़/ कोलकाता/ चेन्नई/ लखनऊ/ नई दिल्ली/देहरादून / जयपुर/अमरावती।

Sub: - Sale of wheat and rice under OMSS (D).

संदर्भ:- FCI, Hqrs letter of even no. dated 25.3.2020 and 26.03.2020.

Sir,

Please refer to the communications cited above.

In continuation to above it is further clarified that:

1. In wheat procuring states also, e-auctions for sale of wheat will be conducted as per weekly schedule upto 15.04.2020, the position will be reviewed thereafter.

2. Hqrs vide letter dated 26.03.2020 has allowed any buyer who intend to buy foodgrains from FCI at OMSS rates by approaching the concerned District Magistrate, State Govt. for his requirement. It is clarified that this provision is only for wheat product manufacturing units and not for sale of rice.

Yours faithfully,

27/3/20

(Deepak Sharma)
GM (Sales)
For ED (Sales)

Copy to: -

1. All Food Secretaries, State Govts.
2. Additional Secretary (Policy & FCI), Deptt. of F &PD, Ministry of CAF & PD, Krishi Bhawan, New Delhi ... For information please.
3. ED (T)/Chairman Task Force, FCI, Hqrs, New Delhi... For information please.
4. All EDs, FCI, Hqrs, New Delhi... For information please.
5. General Manager (Movement/QC/Accounts), FCI, Hqrs... For information please.
6. M/s mjunction Services Limited... for information and necessary action please.

For ED (Sales)

Scanned by CamScanner
Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
२१४, विस्तार इमारत, मंत्रालय,
मुंबई- ४०००३२.

दूरध्वनी क्र. ०२२- २२७९३६४१ ई मेल:- napu22.mhpds@gov.in

क्र: संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ६१/नापु २२ दि. ३१ मार्च, २०२०.

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी.
२. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
३. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.

विषय : COVID-१९ विषाणुच्या प्रादुर्भाव- लॉकडाऊन कालावधीत वेघर, विस्थापित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी निवारागृह, अन्नधान्य व्यवस्थेबाबत करावयाच्या तातडीच्या उपाययोजनेबाबत.

संदर्भ : १. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र. ९२/डीआयएसएम-१, दि. २९ मार्च, २०२०.

२. भारतीय अन्न महामंडळाचे पत्र क्र. J. १ (१)/२०१९-२०/OMSS (D)/BC/S.III/Vol.III,

Dt. २७.०३.२०२०

संदर्भाधीन पत्र क्र. १ व २ सुलभ संदर्भासाठी या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्र. १ मधील शासन निर्णयान्वये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशामुळे वंद झालेल्या उद्योग व्यवसायातील प्रभावीत झालेले कामगार परराज्यातील विस्थापित कामगार व वेघर व्यक्ती यांसाठी निवारागृह, अन्न, पाणी, वैद्यकीय देखभाल या सुविधा स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने केंद्रीय किचन व्यवस्थेच्या माध्यमातून शिजवलेले/शिजवण्यासाठी तयार अन्नाचा पुरवठा करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला आहे. या अनुषंगाने लॉकडाऊनच्या कालावधीत जिल्ह्यात विविध ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात कम्युनिटी किचन सुरु करण्याच्या सूचना आहेत. कम्युनिटी किचनमार्फत भोजन व्यवस्था करताना संवधित केंद्राना अन्नधान्याचा पुरवठा करणे आवश्यक ठरते. त्यानुसार अन्नधान्य उपलब्ध करण्याकरीता संदर्भाधीन पत्र क्र. २ येथील भारतीय अन्न महामंडळाच्या पत्रान्वये OMSS (D) या योजनेखाली संबधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्याच्या आवश्यकतेनुसार गव्हाची मागणी भारतीय अन्न

Scanned with CamScanner

महामंडळाकडे केल्यास त्यांना OMSS दराने गहू उपलब्ध करण्यात येणार आहे. सबब, COVID १९ विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या लॉकडाऊन पार्श्वभूमीवर अन्नधान्य उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सदर्भाधीन पत्र क्र. २ आपणांस पाठविण्यात येत आहे.

३. याकरीता आवश्यक असलेला निधी वर नमूद शासन निर्णयातील अनु. क्र. ७ (ब) (iii) मधील तरतूदीनुसार मदत व पुर्नवसन विभागाकडून उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे सदर अन्नधान्य अनु क्र. ७ (ब) (v) मधील तरतूदीचे पालन करुन विस्थापित झालेले मजूर बेघर व्यक्ती, प्रवासादरम्यान अडकलेले व्यक्ती इ. ना उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

(स. श्री. सुपे)
सह सचिव, अन्न नागरी पुरवठा विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

सह सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई: ३२.

Scanned with CamScanner

कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावाच्या पार्श्वभूमीवर
शिवभोजनालयांबाबत सूचना...

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र. शिभोथा २०१९/प्र.क्र.५१ (अ)/नापु-१७,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक. २६ मार्च, २०२०

परिपत्रक :

शासन निर्णय क्र.शिभोथा २०१९/प्र.क्र.५१/नापु-१७, दि.१ जानेवारी, २०२० नुसार गरीब व गरजू व्यक्तींना स्वस्त: दरात शिवभोजन उपलब्ध करुन दिले जात आहे. सदर शासन निर्णयानुसार दि. २६ जानेवारी, २०२० पासून अद्यापपर्यंत गरीब व गरजू व्यक्तींना सदर भोजनालयांतून सुरळीत भोजन उपलब्ध करुन देण्यात येत होते. तथापि, कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे संपूर्ण राज्यात लॉकडाऊन घोषित झाले असल्यामुळे शिवभोजन उपलब्ध करुन देणारी भोजनालये सद्यस्थितीत बंद केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता शासन पुढील निर्देश देत आहे-

शिवभोजनालयाची वेळ दररोज दु. १२.०० ते ३.०० अशी राहील. दि. १ एप्रिल, २०२० पासून या योजनेचा तालुका स्तरावर विस्तार करण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यांस देण्यात आलेल्या इष्टांकात पाच पट वाढ करण्यात येत आहे. सर्व जिल्ह्यांनी त्यांच्या इष्टांकाची पूर्तता करावी.

शिवभोजन उपलब्ध करुन देणारी भोजनालये दररोज दु. १२.०० ते ३.०० या वेळात गरीब व गरजू व्यक्तींना शिवभोजन उपलब्ध व्हावे यासाठी सुरु राहतील. तथापि, सदर भोजनालयांतून फक्त आणि फक्त शिवभोजनच उपलब्ध करुन देण्यात येत आहे याची कटाक्षाने पाहणी करण्याची जबाबदारी संबंधित उप नियंत्रक शिधावाटप, जिल्हापुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी यांची राहील.

शिवभोजनालय चालकाने शिवभोजन उपलब्ध करुन देताना पुढील खबरदारी घ्यावी.

१) भोजनालय दररोज फक्त दु. १२.०० ते ३.०० या वेळात शिवभोजन उपलब्ध करुन देण्यासाठी सुरु राहील. भोजनालयातून व्यावसायिक कारणासाठी जेवण उपलब्ध करुन दिल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
२) शिवभोजनालय चालकांनी ग्राहकांना शक्यतो आवेष्टित स्वरुपात भोजन (packed food) उपलब्ध करुन द्यावे.
३) शिवभोजन तयार करणाऱ्या व्यक्तींनी शिवभोजन तयार करण्याआधी त्यांचे हात कमीत कमी २० सेकंद साबणाने स्वच्छ धुवावेत.
४) शिवभोजनाची सर्व भांडी निर्जंतूक करुन घ्यावीत.
५) शिवभोजन तयार करणाऱ्या तसेच वाटप करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी वारंवार साबणाने हात धुवावेत.
६) शिवभोजनालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी मास्कचा वापर करावा.

Scanned with CamScanner

७) शिवभोजनालय चालकाने प्रत्येक ग्राहकामध्ये कमीत कमी ३ फूट (१ मीटर) अंतर राहील याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(चारुशीला तांबेकर)
शासनाच्या सह सचिव

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व जिल्हाधिकारी,
३) नियंत्रक शिधावाटप, मुंबई
४) सर्व उप आयुक्त (पुरवठा),
५) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
६) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,

वरील अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील शिवभोजनालय चालकांच्या निदर्शनास आणाव्या.

७) मा.मंत्री (अ.ना.पु व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
८) मा.राज्यमंत्री (अ.ना.पु व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
९) निवडनस्ती, कार्यासन नापु-१७.

Scanned with CamScanner

**कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे "शिवभोजन थाळी" लाभधारकास ५ रुपयांत उपलब्ध करून देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक - शाभोथा-२०१9/प्र.क्र.51/नापु-17**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-400 032
दिनांक- २९ मार्च, २०२०

**वाचा** :-1)शासन निर्णय क्रमांक - शाभोथा-२०१9/प्र.क्र५१/नापु-१७,दि. ०१ जानेवारी, २०२०.
2) शासन निर्णय समक्रमांक, दि. १८ फ़ेब्रुवारी, २०२०.
3) परिपत्रक क्र. शिभोथा-२०१९/प्र.क.५१ (अ)/ नापु १७, दि २६ मार्च, २०२०.
४) परिपत्रक क्र. शाभोथा-२०१९/प्र.क.५१ (अ)/ नापु १७, दि २८ मार्च, २०२०.

**परिपत्रक**:-

कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे मजूर, स्थलांतरित, बेघर तसेच बाहेरगावचे विद्यार्थी इत्यादी लोकांचे जेवणा अभावी हाल-अपेष्टा होत आहे. ही बाब लक्षात घेता शासन सर्व संबंधितांना निर्देश देत आहे की, शिवभोजनाच्या प्रती थाळीसाठी लाभधारकाकडून पाच रुपये इतकी आकारणी करावी. सदर आकारणी दि.३० मार्च, २०२० पासून लागू असेल. याबाबत वाढीव अनुदान यथावकाश उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच पुढील तीन महिन्यांपर्यंत याच दराने शिवभोजन थाळीचा दर असेल. संबंधित उपनियंत्रक शिधावाटप, जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी, तहसीलदार यांनी सदर बाब तात्काळ भोजनालय चालकांच्या निदर्शनास आणून त्याची अंमलबजावणी करावी व या बाबीस व्यापक प्रसिद्धी द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सतिश सुपे )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१)सर्व जिल्हाधिकारी
२)नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
३) सर्व (उपायुक्त) पुरवठा
४) सर्व उपनियंत्रक
५)सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
६)सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
७) सर्व तहसीलदार, सर्व गट विकास अधिकारी, सर्व मुख्याधिकारी

Scanned with CamScanner